**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक:-तंशिस/शैवि/महाडीबीटी/शिष्य./२०२४-२५/ 1012 दिनांक:- 19 MAR 2025

प्रति,

प्राचार्य /संचालक,

बी.बी.ए., बी.बी.एम., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- शै. वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखात्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत.**

संदर्भ:- १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शिष्यवृ-२०२४/ प्र.क्र.२४५/ तांशि-४, दि. ७.०८.२०२४

२. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शिष्यवृ-२०२४/ प्र.क्र.२५२/ तांशि-४, दि. ३.०२.२०२५

२. मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे कार्यासन क्र.१८ / तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/१४७ दि. १०/०३/२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांच्या मान्यतेस अनुसरून शै. वर्ष २०२४-२५ पासून शासन निर्णयान्वये **बी.बी.ए., बी.बी.एम., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांच्या संस्थांना मान्यता प्रदान केली आहे.** तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आलेले असून दिनांक ०३/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वरील अभ्यासक्रमांना शै. वर्ष २०२४-२५ पासून **१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना,** या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने शै. वर्ष २०२४-२५ करिता, संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्याअनुषंगाने डीबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाही बद्दल खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. जे अभ्यासक्रम शै. वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरू करण्यात शासन मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नितआहेत, त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थामधील अभ्यासक्रमांना त्या पुर्वीच्या शै. वर्ष २०२३-२४ मध्ये शुल्क आकारण्यात यावे.

२. ज्या संस्थांमध्ये सदर अभ्यासक्रम शै. वर्ष २०२४-२५ पुर्वी पासून सुरू होते. मात्र, शै. वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने, त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क त्या अभ्यासक्रमांना त्यापुर्वीच्या शै. वर्श २०२३-२४ मध्ये संबंधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

**महाडिबीटी पोर्टलवर संस्थेचे प्रोफाईल अपडेट करून वरील निर्देश दिल्याप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क भरून ऑनलाईनरित्या Send for Approval करिता पाठवावे. तसेच शुल्क संबंधित कागदपत्रे हस्तदेय या कार्यालयास सादर करण्यात यावे.**

सहपत्र:- संर्भिय पत्र संलग्न

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर

AC

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल: desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट / ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ १४८
दिनांक:- १०/०३/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दि. ७.८.२०२४
२) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि-४, दि. ३.२.२०२५
३) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.६.३.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी शै वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत (As and Where ) परिषदेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये तसेच तदनंतरही बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य

सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष ,मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करुन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

येथे नमूद करण्यात येते की, संदर्भाधीन दिनांक ३.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत वरील अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर शिष्यवृत्तीयोजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शासनाडिबीटी योजनेतून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून ते प्रशासकीय कारणास्तव व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून विलंबाने घोषित झाले आहेत. सदर अभ्यासक्रमांचे शुल्क प्रथमच शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करावयाचे आहे. मात्र सदर अभ्यासक्रमांच्या संस्थांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हा संक्रमण कालावधी असल्यामुळे शुल्क नियामक पाधिकरणाच्या विनंतीच्या अनुषंगाने या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन पत्र दिनांक ६.३.२०२५ अन्वये मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्राप्त आदेशानुसार केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्यानुषंगाने डिबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीबद्दल खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नित आहेत, त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थामधील अभ्यासक्रमांना त्या पुर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात यावे.
२) ज्या संस्थांमध्ये सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वीपासून सुरु होते. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने,त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क हे त्या अभ्यासक्रमांना त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये संबंधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

संदर्भ क्र. ३ नुसार बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित होऊन या अभ्यासक्रमांना शासनाची शिष्यवृत्ती योजना लागू केली असून डिबीटी पोर्टलवर या संस्थांचे शुल्क नोंद करणे अनिवार्य आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे शुल्क

आकारण्याच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांकरिता संस्थांचे (नवीन अथवा जुन्या संस्था) शुल्क डिबीटी पोर्टलवर मंजूर करताना सहसंचालक, विभागीय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, संबंधित संस्थेकरिता विद्यापीठांकडून प्रमाणित करण्यात आलेले शुल्क तात्पुरते शुल्क (Ad Hoc Fee) म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ग्राह्य धरावे व याकरिता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय सहसंचालक कार्यालयाची असेल याची नोंद घ्यावी. तसेच याबाबत सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना याबाबत अवगत करावे.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव:

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना
२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना
३. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहिकरिता:

१. सर्व प्राचार्य, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड संस्था

**बीसीए/बीबीए/बीएमएस सह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत समावेश करण्यास सचिवस्तरीय प्रदत्त समितीने दिलेल्या मान्यतेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि-४
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०३ फेब्रुवारी, २०२५.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.

२) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या दि.१२.०८.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील पात्र विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाव्दारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती तसेच, डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत निर्वाह भत्ता देण्यात येतो. सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत संदर्भ क्रमांक १ येथील दि.०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार नवीन अभ्यासक्रमांचा आवश्यकतेनुरुप समावेश करण्याबाबत, उचित निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील सचिवस्तरीय प्रदत्त समितीला अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार सदर शिष्यवृत्ती योजनेमध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या बीसीए/ बीबीए/बीएमएस सह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त बीसीए/बीबीए/बीएमएस सह १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नव्याने समावेश करण्याचा प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखालील सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या दि.१२.०८.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत संदर्भ क्रमांक २ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे. सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या सदर निर्णयानुसार या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त बीसीए/ बीबीए/ बीएमएस सह १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज

शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रयोजनासाठी सन २०२४-२५ मध्ये आवश्यक अर्थसंकल्पीत तरतुद करण्याची कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०२०३१५२८१२०८०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=891b9227cbfc5a688b110ab53810ab4d94960474021325e10e794cb784d2e6a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7113210379DB8F8304AC958953787A4C6EC1B3F193419BA4C6971FA4CD5F15E, cn=THORAT AJITKUMAR ARUNRAO
Date: 2025.02.03 15:30:41 +05'30'

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (अर्थ व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१६. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
१७. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
१८. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२०. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३. सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. निवडनस्ती/तांशि-४.

परिशिष्ट –अ

शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि-४, दि.०३ फेब्रुवारी, २०२५ सोबतचे परिशिष्ट

| Sr.No | Course Name | Stream Name | Program Name | Whether Course is Professional ? (YES/NO) | Duration (Years) | Level of Course | Concerned Department | Concerned Directorate |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Electrical and Electronics Engineering | Engineering And Technology | Post SSC Diploma (Polytechnics) | Yes | 3 | Diploma | Higher and Technical Education | DTE |
| 2 | IC Manufacturing | Engineering And Technology | Post SSC Diploma (Polytechnics) | Yes | 3 | Diploma | Higher and Technical Education | DTE |
| 3 | Advanced Computer Application | Engineering And Technology | Bachelor of Technology (B.Tech.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 4 | Advanced Computer Application | Engineering And Technology | Bachelor of Engineering (B. E.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 5 | Architectural Assistantship | Engineering And Technology | Bachelor of Technology (B.Tech.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 6 | Architectural Assistantship | Engineering And Technology | Bachelor of Engineering (B. E.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 7 | Technical Textiles | Engineering And Technology | Bachelor of Technology (B.Tech.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 8 | Technical Textiles | Engineering And Technology | Bachelor of Engineering (B. E.) | Yes | 4 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 9 | MBA (Banking and Financial Services) | Management | MBA/ MMS | Yes | 2 | Post Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 10 | MBA (Digital Marketing) | Management | MBA/ MMS | Yes | 2 | Post Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 11 | BBA | Management | Bachelor of Business Administration/Bachelor of Management Science | Yes | 3 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 12 | BMS | Management | Bachelor of Business Administration/Bachelor of Management Science | Yes | 3 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 13 | BCA | MCA | Bachelor of Computer Applicatioin | Yes | 3 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 14 | MASTER OF BUSINESS ADMINISTRATION (INTEGRATED) | Management | MBA/ MMS (Integrated) | Yes | 5 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 15 | MASTER OF BUSINESS ADMINISTRATION (PHARMA TECH) | Management | MBA/ MMS (Integrated) | Yes | 5 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 16 | MBA TECH COMPUTER ENGINEERING | Management | MBA/ MMS (Integrated) | Yes | 5 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 17 | MBA-Tech | Management | MBA/ MMS (Integrated) | Yes | 5 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |
| 18 | BBA/MBA | Management | MBA/ MMS (Integrated) | Yes | 5 | Under Graduate | Higher and Technical Education | DTE |